/ ②

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ औरंगाबाद.

दिनांक ३०/६/२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता झालेल्या औरंगाबाद मंडळाच्या १२८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा.आ.श्री. कुंडलीकराव नागरे | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २. मा.श्री. के. बी.गवळी | मुख्य अधिकारी तथा उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३. मा. श्री. विश्वासराव उपासे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ४. मा. श्री. बबनराव देशमुख | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ५. मा. ॲड. श्री. जे.पी. पाटील | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ६. मा. श्री. संजय वाघचौरे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ७. मा. श्री. वामनराव राउत | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ८. मा.श्री. चाँदपाशा इनामदार | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ९. मा. श्री. राजेश्वर चव्हाण | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १०. मा. श्री. मकरंद सावे | सदस्य औरंगाबाद मंडळ |

मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांचे परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र १ :- दिनांक ३०.५.२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १२७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक ३०/५/२००३ रोजी झालेल्या १२७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांता विषयी विस्तृत माहिती मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली सविस्तर चर्चा अंती दिनांक ३०/५/२००३ रोजीच्या १२७ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत सर्वानुमते मान्य केला व निर्णय घेतला की,

**ठराव क्र ७६३ :- दिनांक ३०/५/२००३ रोजी झालेल्या १२७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.**

**विषय क्र २:- गेवराई येथील रिक्त असलेल्या गाळयांच्या किंमती कमी करुन त्याची विक्री करणेबाबत.**

या बाब टिप्पणी विषयी मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, गेवराई येथे मंडळाने ८८ गाळे अत्यल्प उत्पन्न गट व ८ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळे वाटपासाठी दोन वेळा जाहिरात दिली असुन सध्या प्रथम येणा-यास प्रथम गाळा या तत्वावर वाटप चालु आहे. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी असेही प्रतिपादन केले की, प्रथम गाळा वाटपाच्या नंतर देण्यांत आलेल्या जाहीरातीनुसार मंडळाने केलेल्या गुंतवणुकीवरील व्याजाचे भांडवलीकरण व आता पर्यन्तचे हप्ते लाभधारकांना भरावे लागत असल्यामुळे गाळा ताब्यात घेण्यापुर्वी भरावी लागणारी रक्कम आवाक्याच्या बाहेर जात असल्याने मंडळाच्या निर्णयानुसार कालावधी १/९/०२ पासुन पुढे चौदा वर्ष अशी सवलत देवुन प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर गाळे वाटपास काढले असता त्यासही प्रतिसाद मिळाला नाही व रिक्त गाळे वाटपा संबंधी प्राधिकरणाचे प्रचलित धोरणानुसार किंमतीच्या २० टक्के किंमत कमी करुन गाळे विकण्याबाबतचे अधिकार मंडळास आहेत व तसेच अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळयांची किंमत बाब टिप्पणीतील रकाना क्र ६ मध्ये दर्शविलेल्या किंमतीप्रमाणे विक्री करण्याचे प्रस्तावीत आहे. यावर

मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, परभणी येथील रिक्त गाळे वाटपासाठी प्राधिकरणाने गाळयांचे किंमतीच्या ५० टक्के पर्यन्त किंमत कमी करुन वाटपास परवानगी दिलेली आहे त्याच धर्तीवर गेवराई

,उदगीर व नांदेड येथील गाळे देखील ५० टक्के किंमत कमी करुन वाटप करावा . यावर मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, प्राधिकरणाने ५० टक्के पर्यन्त किंमत कमी करावी असे सुचित केलेले असल्याने एकदम ५० टक्के किंमत कमी करणे योग्य होणार नाही. त्यावर मा. सभापती यांनी असे सुचित केले की, प्रथम ४० टक्के किंमत कमी करुन जाहिरात दयावी व प्रतिसाद न मिळाल्यास ५० टक्के किंमत कमी करावी.
या विषयावर सविसतर चर्चा झाल्यानंतर मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की,

**ठराव क्र ७६४:- गेवराई प्रमाणेच, उदगीर व नांदेड येथील रिक्त गाळे विक्री व्हावेत व म्हाडाचा अडकलेला निधी मोकळा व्हावा यासाठी परभणी येथील रिक्त गाळयांचे बाबतीत प्राधिकरणाने त्यांचे ठराव क्रमांक ५९०३ दिनांक २१/४/२००३ नुसार घेतलेल्या निर्णयाप्रमाणे तेथील सध्याचे गाळे विक्री किंमतीच्या ४० टक्के किंमत कमी करुन जाहिरात देण्यांत यावी व मंडळाचा अडकलेला निधी मोकळा करावा यासाठी आवश्यक ती परवानगी प्राधिकरणाकडुन घेण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करुन पुढील कार्यवाही करावी.**

वरीलप्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मा. सभापती व सर्व सदस्यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले.

१. मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, प्रत्येक तालुक्यात म्हाडाची योजना लागु करावी व मराठवाडयात एकुण ३०,००० घरकुल बांधण्याचा प्रस्तावा हाती घ्यावा.

२. मा. सदस्य श्री. मकरंद सावे यांनी सांगितले की, शाहानुरवाडी येथील गाळयांचे बांधकाम फारच मंदगतीने चालु आहे. त्यासाठी मंडळाचे जे कांही नुकसान झाले आहे ते कंत्राटदारांकडुन व्याजासह वसुल करावे . यावर मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, योजनेचे कंत्राटदारावर काम मंदगतीने चालु असल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

३. मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी बोरी व भो करदन येथील योजनेबाबत विचारणा केली असता
मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी माहिती दिली की, बोरी येथे ७ ग्रुप पैकी २ ग्रुपचे काम प्रगतीपथावर असुन लिंटल लेवलपर्यन्त ४८ गाळयांचे काम पुर्ण झाले असुन उर्वरीत गाळयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व तसेच भोकरदन येथील योजनेस कामाचे आदेश दिलेले असुन काम प्रगतीपथावर आहे यावर मा. सदस्य श्री. बबनराव देशमुख यांनी सांगितले की, भोकरदन येथील गाळयांचे बांधकामचा दर्जा व गुणवत्ता बाबत काळजी घेण्याविषयी संबंधीतांना सूचना दयावेत.

४. मा. सदस्य श्री. चाँदपाशा इनामदार यांनी लातूर विभागात कर्मचारी वृंद फारच कमी आहे. करिता कर्मचारी वृंद दयावे असे सांगितले व तसेच मा. सदस्य श्री. चाँदपाशा इमनादार यांनी असेही प्रतिपादन केले की, लातूर येथे दोन महिला अभियंता यांची नेमणुक केली आहे व त्या सध्या काम करीत नाहीत करिता त्यांची बदली इतरत्र करुन त्यांचे जागी इतर अभियंते यांची नेमणूक करावी. लातूर येथे विभागी य कार्यालय व विश्राम गृह बांधणे यासाठीचा प्रस्ताव त्वरीत तयार करावे असेही बैठकीत मा. सदस्य श्री. चांदपाशा इनामदार यांनी प्रतिपादन केले. यावर मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी असे सांगितले की, मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेवर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

वरीलप्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.